Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# कथाकथनातून पर्यावरण विषयक जाणीव जागृती

**प्रा. प्रताप बी. आत्रे,**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**शिक्षणशास्त्र महाविदयालय, नाशिक.**

**प्रस्तावना :**

पर्यावरणाची समस्या ही पर्यावरणाइतकीच सर्वव्यापी झाली आहे. निसर्गाशी लढा देऊन त्याच्यावर विजय मिळविण्याच्या प्रयत्नात आपण निसर्गाची खूपच हानी केलेली आहे. पर्यावरणाची समस्या ही बाहय निसर्गातील असली तरी तिचे मुळ आपल्या मनोवृत्तीत, विचारांत आहे. आपली भोगवादी वृत्ती, हाव, आक्रमकता ही या समस्येला कारणीभूत आहे. माणूस हा पर्यावरणाचा एक भाग आहे. माणसाच्या बदलत्या राहणीमानामुळे निसर्गाचे चक्र बदलत आहे. माणसानं पर्यावरण संतुलन न बिघडवता, पर्यावरणाशी जुळवून घेऊन राहणं गरजेचं आहे ही जबाबदारी कोणत्या एका मंडळाची किंवा शासनाची नसून प्रत्येक नागरिकाची आहे. आजपर्यंत माणूस फक्त निसर्गाकडून घेत आला, त्यामुळे झालेली हानी भरुन काढण्यासाठी आता प्रयत्न करायला हवेत. ही पर्यावरण विषयक समस्या सोडविण्यासाठी पर्यावरण विषयक जाणिवा जागृत होण्याची आत्यंतिक निकड आज निर्माण झालेली आहे म्हणून महाराष्ट्र शासनाने पर्यावरण शिक्षणाचा शालेय शिक्षणामध्ये आंर्तभाव केलेला आहे. तसेच प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाच्या दहा गाभाभूत घटकामध्ये ' पर्यावरण संरक्षण ' या गाभा घटकाचा आंर्तभाव करण्यात आलेला दिसून येतो. पर्यावरण संरक्षण हा गाभा घटक रुजवितांना खालील उद्दिष्टांचा विचार करावा लागतो.

१) परिसरातील नैसर्गिक समतोलाची जाणीव निर्माण करुन देणे.
२) पर्यावरणातील घटकाची माहिती देणे उदा. नदी, जमीन, हवा इ.
३) पर्यावरण ही संकल्पना केवळ देशाची नसून जगाची आहे याची जाणीव करुन देणे.
४) पर्यावरण जतन करणे.

वरील उद्दिष्ट साध्य करतांना आपणाला विविध बोधकथा विदयार्थ्यांना सांगून पर्यावरण विषयक जाणीव जागृती करता येईल.

**पर्यावरण विषयक कथाकथनाची उपयुक्तता :**

१. बालवयातच पर्यावरण विषयी जाणीव जागृती निर्माण केली तर मुले पर्यावरणाचा समतोल राखण्यास महत्त्वाची भूमिका पार पाडतील त्यासाठी कथाकथनातून अनुभूती देता येतील.
२. कथाकथन हे संस्कार करण्याचे, जाणीव जागृती करण्याचे प्रभावी साधन आहे. कथा ऐकायला सर्वांनाच आवडते. आता मी तुम्हाला छानशी कथा, गोष्ट सांगणार आहे असे म्हणताच शांत बसा असे म्हणावे लागत नाही. सर्व विदयार्थी लगेच कान टवकारुन, उत्सुकतेने तुडुंब भरलेल्या किलबिल्या डोळयांनी शांत बसतात अशा वेळी कोणतीही जाणीव जागृती परिणाम कारक होते.

**पर्यावरणविषयक कथाकथनाची उद्दिष्टे :**

१. पर्यावरण समतोल राखण्यासाठी विदयार्थ्यांमध्ये जाणीव जागृती करणे.
२. दैनंदिन जीवनात पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी विदयार्थ्यांची भूमिका कोणती आहे हे पटवून देणे.
३. कथाकथनाचे कौशल्य विकसित करणे.
४. नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर काटकसरीने करुन आपण देशाची सेवा करु शकतो ही जाणीव निर्माण करणे.
५. सार्वजनिक ठिकाणी आपले वर्तन कसे असावे हे पटवून देणे.
६. विदयार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.
७. विदयार्थ्यांच्या श्रवण क्षमतेचा विकास करणे.

पर्यावरण विषयक जाणीव जागृती करण्यासाठी आपणाला पर्यावरण विषयक कथांचा वेगवेगळया पुस्तकातून, मासिकातून, वृत्तपत्रातून संग्रह तयार करावा लागेल व प्रत्येक कथेचे तात्पर्य व बोध कोणता देता येई ल हे याची निश्चिती करावी लागेल. माझ्या संग्रहात असलेल्या पर्यावरण विषयक कथा व तात्पर्य खालील प्रमाणे :

| अ.क्र. | कथेचे नाव | तात्पर्य / बोध |
|---|---|---|
| १. | माझी गुणी अपत्ये | वृक्ष हीच अपत्य आहेत. झाडांचे स्वतःच्या मुलाप्रमाणे संगोपन, संवर्धन करावे. |
| २. | पर्वत, नदया, झाडे श्रेष्ठ कोण? | पर्वत, नदया, झाडे हे सर्वच एकाच कुटुंबाचे घटक आहेत त्याच्यात श्रेष्ठ कनिष्ठ कोणी नाही त्यांचे संरक्षण करणे जरुरीचे आहे. |
| ३. | पृथ्वीमाता –ओझोनची छत्री व सूर्यमाला | मातेच्या ममतेने या सृष्टीतील सजीवांचे संगोपन पृथ्वी करते आपण ही करावे. |
| ४. | झाडावरची फळे माझी नातवंडे खातील. | झाडांची लागवड भावी पिढीसाठी करणे आवश्यक आहे. |
| ५. | लोकसंख्या व पर्यावरण पिंटू व चॉकलेट | नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर काटकसरीने करावा. |
| ६. | साधनसंपत्ती उर्जासाधने –क्रिकेटचा दिवसरात्र सामना | विजेचा, उर्जेचा अपव्यय, नासाडी, अनावश्यक वापर करु नये. |
| ७. | सुर्योदयदर्शन व कारखान्याचे प्रदूषण | २१ व्या शतकातील प्रदूषणाला आळा घातला पाहिजे. |
| ८. | पर्यावरणाची ओळख –चतुरकन्या | हिरे, मोती, माणिक या धनापेक्षा, हवा, पाणी, सूर्य यांचे महत्त्व अधिक आहे. |

| | | |
|---|---|---|
| ९. | जैवविविधता –प्राणी हडकुळे का? | अन्न साखळी तुटली तर काय होते? जीवो–जीवस्य जीवनम्, जमीन, हवा, पाणी, अन्न एकमेकांवर अवलंबून आहे. |
| १०. | पृथ्वीचे मनोगत पृथ्वीला आनंदी ठेवण्यासाठी काय करावे? | माणूस, प्राणीमात्रावर, वृक्षावर दया करेल. पर्यावरण समतोल राखण्यासाठी प्रयत्न करेल तर पृथ्वी शांत होईल. |
| ११. | खरी कमाई | अपार कष्टाने मिळवलेल्या साधन संपत्तीचा अपव्यय करु नये काटकसरीने वापर करावा. |
| १२. | भारनियमन | विजेचा व पाण्याचा वापर काटकसरीने व पर्याप्त करणे गरजेचे आहे. |
| १३. | रेल्वे प्रवासात बिया बाहेर फेकणारी चतुर आजी | दूरदृष्टीने वृक्षलागवड करण्यासाठी अनावश्यक बिया जंगलात पेराव्यात त्यामुळे मोठया प्रमाणात वृक्ष लागवड होईल. |

आज मानवाने जे पायाभूत विकासासाठी जे विविध प्रकल्प सुरु केले आहेत हे प्रकल्पही पर्यावरणाच्या नव्या समस्या निर्माण करीत आहेत. मानसाच्या गरजा वाढल्यामुळे त्याच्या विकासाचा वेगही त्यानुसार वाढविण्याची धडपड सर्वत्र चालली आहे. परंतु, हा विकास करतांना आपण पुढील विकासाच्या सर्व संधी नाहिशा करुन शकत नाही ना ! या विषयी माणूस फारसा विचार करतांना दिसत नाही. आजची गरज भागली म्हणजे झाले उदयाचे कोणी बघितले अशी मानवाची वृत्ती झाली आहे व हीच वृत्ती पर्यावरणास अतिशय घातक आहे. आपले आजचे जीवनदायी पर्यावरण हा पूर्वजाकडून मिळालेला मालकी हक्काचा वारसा नसून आपल्या पुढील पिढयाकडून उसना घेतलेला ठेवा आहे. हा ठेवा आपल्या मुलाबाळांच्या विकासाच्या आशा आकांक्षा उमलण्यासाठी उपयुक्त ठरला पाहिजे. त्यासाठी आपणास पर्यावरण संरक्षण जाणीव जागृतीसाठी विविध कथांचा उपयोग करता आला पाहिजे. आपण ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करतो. पर्यावरणाची गुणवत्ता वाढविणे समस्या व संवर्धनाविषयी जागरुकता निर्माण करणे आणि पर्यावरण विषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून पोषक वातावरणाची निर्मिती करणे हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा मुख उद्देश आहे. जे झाले ते झाले आता मात्र जागण्याची आणि जागविण्याची वेळ आली आहे.

**संदर्भ :**

१. आहिरराव वा. र. पर्यावरण विज्ञान : निराली प्रकाशन, पुणे.
२. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ – भूगोल इयत्ता १० वी.
३. भांडारकर, के. म. पर्यावरण शिक्षण, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.
४. साळी व झा. तापकीर दत्तात्रय पर्यावरण शिक्षण, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.
५. कार्लेकर श्रीकांत – पर्यावरण समस्या निराकरण व क्षेत्र अभ्यास, डायमंड प्रकाशन, पुणे.